e.mail


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉईंट, मुंबई - २१

दूरध्वनी ०२२-२२०२५३५४,२२०२६२४९,२२८२८९९ फॅक्स ०२२--२२८२११२६९

web : www.mjp.gov.in E-mail : ms@mjp.gov.in


---

जा.क्र. मजीप्रा/गुपप/IT /ई निविदा/ ५ /२०१५ ७ सप्टेंबर ,२०१५

**परिपत्रक क्रमांक - ९६६**

**विषय :-** ई निविदा प्रणाली राबविण्यासाठी Digital Signature Certificate(DSC) उपलब्ध करुन घेणे व त्याचा योग्य वापर करणेबाबत.

**संदर्भ :-** १) तत्कालीन मुख्य अभियंता ( ना व ग्रा ), म.जी.प्रा.ठाणे यांचे परिपत्रक जा.क्र.मजीप्रा/मु.अ. (ना व ग्रा )/तांशा/४४३४/२०१२ दि.३१.१२.२०१२.

२) तत्कालीन मुख्य अभियंता ( ना व ग्रा ), म.जी.प्रा.ठाणे यांचे पत्र जा.क्र.मजीप्रा/मु.अ. (ना व ग्रा )/लेखा/३५१० /२०१२ दि.११.१०.२०१२.

वरील संदर्भिय परिपत्रकान्वये अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना ई निविदा प्रणाली राबविण्यासाठी User Registration करुन Digital Signature Certificate ( DSC) प्राप्त करुन घेणेबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. तसेच सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता यांनी ही User Registration करुन Digital Signature Certificate ( DSC) प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यावेळेस विभागीय लेखापाल यांचेसाठी Digital Signature Certificate ( DSC) बंधनकारक करणेत आले नव्हते.

आता सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता व विभागीय लेखापाल यांनी User Registration करुन Digital Signature Certificate ( DSC) नजिकच्या जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागात TCS (Tata Consultancy Services ) चे प्रतिनिधीशी संपर्क साधून त्वरीत उपलब्ध करुन घ्यावे.

विभागीय लेखापाल यांना ई निविदा प्रणाली मध्ये Tender opener अशी भूमिका व जबाबदारी राहील. विभागीय लेखापाल यांना Digital Signature Certificate ( DSC) साठी म.जी.प्रा.च्या नवीन संरचने प्रमाणे सर्व प्रादेशिक विभागीय मुख्य अभियंता यांची नोडल ऑफीसर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

सदर परिपत्रकानुसार विभागीय लेखापाल यांचेसाठी Digital Signature Certificate ( DSC ) ३० दिवसात प्राप्त करुन घेणेची जबाबदारी संबंधीत नोडल ऑफीसर यांची राहील.

ई निविदा प्रणालीची प्रक्रिया राबवितांना मुख्य अभियंता ते कार्यकारी अभियंता यांची भुमिका व जबाबदारी वरील संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे त्यानसार प्रत्येकाने आपली भुमिका पार पाडावयाची आहे. ई-निविदा प्रणालीची प्रक्रिया आत्मसात करुन सदर प्रक्रिया राबवितांना Digital Signature Key चा वापर संबंधीत जबाबदार अधिका-यांनी स्वतः करावयाचा आहे.

Digital Signature Key चा दुसयास वापर करणेस दिल्यास वापरकर्ता सदर Key चा दुरुपयोग करु शकतो. त्यामुळे ई निविदेच्या मूळ संकल्पनेस बाधा येऊ शकते तसेच निविदा प्रक्रियेच्या गोपनीयतेचा भंग होऊ शकतो.

यास्तव ई-निविदेची प्रक्रिया बाहेरील व्यक्ती / संस्थेव्दारे सेवामोलाने करण्यात येऊ नये तसेच स्वतःची Digital Signature Key कोणत्याही परिस्थितीत वापर करणेस दुस-यास देऊ नये.

असे झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदस्य सचिव**

प्रत :- १) सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- २) सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- ३) सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा., माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- ४) सर्व विभागीय लेखापाल, म.जी.प्रा., माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- ५) संचालक ( वित्त ), म.जी.प्रा. माहिती साठी.